# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 24/03/2021 (बुधवार)

(सायंकाळ)

---

## खून करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन जन्मठेपेची शिक्षा

पो.स्टे. कन्हान :– पो.स्टे. कन्हान दिनांक 24/07/2016 चे 17.26 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सर तर्फे सपोनि विजय पोटे पो.स्टे. कन्हान यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे अप. क्र. 86/2016 कलम 302 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 24/07/2016 चे 06.00 वा. दरम्यान आरोपी नामे– विशाल चंदु वाटोळे, वय 34 वर्ष, रा. यशवंत नगर तारसा रोड नागपूर हा त्याची पत्नी मृतक नामे– सौ. मंगला विशाल वाटोळे, वय 22 वर्ष, रा.यशवंत नगर तारसा रोड नागपूर हिचे चारिन्र्यावर संशय घेत होता. याकारणावरून आरोपीने मृतक हिला शिवीगाळ व झगडा भांडण करून तिच्या डोक्यावर लाकडी दांडयाने मारून गंभीर जखमी करून जिवानिशी ठार केले. आरोपीला दिनांक 24/07/2016 चे 18.49 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक श्री. देवानंद लोणारे पो.स्टे. कन्हान यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 24/03/2021 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. पाटील, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 325(2), 302 भादंवि. मध्ये जन्म ठेपेची शिक्षा तसेच 10,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 6 महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती पांडे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी कर्मचारी म्हणुन सहा.फौज. श्री. वासुदेव मस्के, शंकरराव तराळे, नत्थु इवनाते, पोहवा श्री. मनोज तिवारी, सुनिल डोंगरे, अशोक शुक्ला यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर